महाराष्ट्र शासन

क्रमांक:-एनजीसी-३५९१/४३०९/विशि-२.
शिक्षण व सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.
दिनांक- १९ सप्टेंबर, १९९१.

प्रति,

कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

विषय:- सन १९९१-९२ या शैक्षणिक वर्षापासून कला, वाणिज्य व विज्ञान विद्याशाखांची नवीन महाविद्यालये उघडण्यास परवानगी देण्याबाबत...

महोदय,

सन १९९१-९२ या वर्षापासून नवीन महाविद्यालये उघडण्याकरिता शासनाकडे प्राप्त झालेल्या शिफारशींचा विचार करून सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, ता. सांगोला, जिल्हा सोलापूर ........... या संस्थेला १९९१-९२ पासून खाली नमूद केल्याप्रमाणे नवीन महाविद्यालये उघडण्याकरिता आलेल्या अर्जावर शिवाजी विद्यापीठ अधिनियम १९७४ च्या कलम ४३[४]व[५] अन्वये पुढील कार्यवाही करण्याची विद्यापीठास परवानगी देण्याचे शासनाने ठरविले आहे.

| महाविद्यालयाचे ठिकाण | विद्याशाखा |
| --- | --- |
| सांगोला, ता. सांगोला, जि. सोलापूर | विज्ञान |

२. शासनाने संलग्नीकरणाकरिता वर दिलेली परवानगी ही पुढील अटींवरच आहे :-

१] सदर महाविद्यालयास सध्या विना अनुदान तत्वावर परवानगी देण्यात आली आहे. शासन निर्णय क्र. एनजीसी-२०८८/[१६५२]/विशि-२अ, दि. ४.१.१९८९ अन्वये लागू करण्यात आलेल्या सूत्रानुसार या महाविद्यालयाला अनुदानसंहिता तत्वावर आणण्याचा विचार यथावकाश करण्यांत येईल.

२] ज्या विद्याशाखा उघडण्याची परवानगी देण्यात आलेली आहे, त्या प्रत्येक विद्याशाखेच्या पदवी परीक्षेच्या पहिल्या वर्षाच्या वर्गात कमीत कमी ६० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला तरच वर्ग १९९१-९२ पासून

....२

Scanned with OKEN Scanner

सुरु करावा. तसेच १९९१-९२ या शैक्षणिक वर्षाच्या शेवटी होणाऱ्या प्रथम वर्षाच्या विद्यापीठ परीक्षा कमीत कमी ५० विद्यार्थी बसले पाहिजेत.

३. स्थानिक चौकशी समिती, कार्यकारी परिषद व सिनेट यांचा अहवाल विद्यापीठाकडून प्राप्त झाल्यानंतर कलम ४३[६]व[७] यानुसार अंतिम संलग्नीकरणाचे आदेश शासनाकडून निर्गमित करण्याबाबत योग्य ती कार्यवाही केली जाईल.

४. संबंधित संस्थेस महाविद्यालय सुरु करण्याची परवानगी घेतांना त्या संस्थेस विद्यापीठाने असे कळवावे की, प्रवेश सध्या तात्पुरत्या स्वरुपात द देऊन जर ६० विद्यार्थी प्रवेश घेतील तरच प्रत्यक्षात वर्ग सुरु करावेत. महाविद्यालयात पुढे देण्यांत येणारे संलग्नीकरण ही अट पूर्ण करण्यावरच अवलंबून राहील. अन्यथा महाविद्यालयांना संबंधित विद्याशाखा बंद करावी लागेल. कलम ४३[६] व[७] अनुसार संलग्नीकरणाचा अंतिम प्रस्ताव शासनाकडे पाठवितांना ही अट पूर्ण झाली किंवा नाही याबद्दल प्रस्तावामध्ये उल्लेख करावा अशी त्यांना विनंती करण्यांत येत आहे.

पत्राची प्रत संबंधित व्यवस्थापनाकडे पाठविण्यांत येत आहे.

आपला विश्वासू,

[signature]

[ शरद परब ]
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत:-

शिक्षण संचालक [उच्च शिक्षण], महाराष्ट्र राज्य, पुणे.
प्रशासन अधिकारी [उच्च शिक्षण अनुदान] कोल्हापूर विभाग, कोल्हापूर
सचिव, सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, ता. सांगोला, जि. सोलापूर

२] महाविद्यालय सुरु करण्याच्या संदर्भात विद्यापीठ अधिनियमानुसार प्रथम विद्यापीठाशी संपर्क साधावा.

राज्यमंत्री [शिक्षण] यांचे खाजगी सचिव.

शिक्षणमंत्री यांचे खाजगी सचिव.

निवड नस्तती विशि-२/विशि-२ अ.

B.Sc Part-I - second Division Permission

शैक्षणिक वर्ष २०१० -११
अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात
अतिरिक्त तुकड्यांना मान्यता

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन आदेश क्रमांक एनजीसी २०१०/(२२६/१०)/मशि-४**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : १४ जुलै २०१०**

**पहा:-** १) शासन निर्णय क्रमांक-एनजीसी २०१० / (७/१०) / मशि-४,
दि.१५.१.२०१०, व दि. ३.४.२०१० (Task Force)
२) शासन पत्र क्रमांक-एनजीसी २०१० / (७/१०) / मशि-४,
दि.१५.३.२०१०, (Task Force)
३) संचालक, उच्च शिक्षण यांचे पत्र क्र. अमवि २०१०/कोवि/ प्रस्ताव १०-११/
अ.क.ड. / मवि २-३ / १७४० दिनांक १९.६.२०१०

## शासन आदेश

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील कलम ८२(४) नुसार राज्यातील विद्यापीठांनी शासनाकडे अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात अतिरिक्त तुकडी मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावयाचे असतात, त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१०-११ साठी राज्यातील विद्यापीठांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची अनुक्रमे शासन निर्णय व शासन पत्र क्रमांक-एनजीसी २०१०/ (७/१०) / मशि-४, दि. १५.१.२०१०, दि. ३.४.२०१० व दि. १५.३.२०१० अन्वये स्थापित कृतिसमितीद्वारे छाननी करण्यात आली. कृती समितीचे अभिप्राय / शिफारशी व विद्यापीठाच्या शिफारशी विचारात घेऊन महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ८२(५) व ८३(५) अन्वये शासनास प्राप्त अधिकारानुसार अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात पुढील विवरणात नमूद केल्यानुसार अतिरिक्त तुकड्यांना खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून **कायम विना अनुदान तत्वावर** मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे / महाविद्यालयाचे नाव | मान्यता दिलेल्या अतिरिक्त तुकड्या |
|---|---|---|
| | **मुंबई विद्यापीठ, मुंबई** | |
| १. | हिंदी विद्या प्रचार समितीचे, रामनिरंजन झुनझुनवाला महाविद्यालय, घाटकोपर रेल्वे स्टेशन समोर, घाटकोपर (पश्चिम), मुंबई- ४०० ०८६. | एफ.वाय.बी. कॉम -१<br>एफ.वाय बी.एम.एस.-१ |
| २. | केळकर शिक्षण संस्थेचे, विनायक गणेश वझे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, मिठागर रोड, मुलुंड (पुर्व), मुंबई- ४०० ०८१ | एफ. वाय. बी. एस्सी. -१ |
| ३. | ठाकुर एज्युकेशन ट्रस्टचे, ठाकुर विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, ठाकुर व्हिलेज, कांदिवली (पुर्व), मुंबई- ४०० १०१. | एफ.वाय.बी. कॉम -२<br>एफ.वाय.बी. एस्सी (एव्हिएशन) -१<br>एफ.वाय बी.एम.एस.-१ |

श्री वानकर सर
योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी
24.7.10

शासन आदेश क्रमांक एनजीसी २०१०/(२२६/१०)/मशि-४, दिनांक : १४ जुलै २०१०
(शैक्षणिक वर्ष २०१०-११ अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात अतिरिक्त तुकड्यांना मान्यता )

| अ.क्र. | संस्थेचे / महाविद्यालयाचे नाव | मान्यता दिलेल्या अतिरिक्त तुकड्या |
|---|---|---|
| ११५. | जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर, जि.कोल्हापूर. | बी.ए.भाग - १<br>तिसरी अतिरिक्त तुकडी<br>बी.कॉम.भाग - १<br>दुसरी अतिरिक्त तुकडी<br>बी.एस्सी.भाग - १<br>दुसरी अतिरिक्त तुकडी |
| ११६. | लोकनेते हणमंतराव पाटील कला, वाणिज्य महाविद्यालय, विटा, जि.सांगली. | बी.ए.भाग-२ दुसरी अतिरिक्त तुकडी नैसर्गिक वाढ |
| ११७. | श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली. | बी.एस्सी.भाग-१ दुसरी अतिरिक्त तुकडी<br>बी.एस्सी.भाग-२ दुसरी अतिरिक्त तुकडी |
| ११८. | श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, सांगली. | बी.एस्सी.भाग-१ दुसरी अतिरिक्त तुकडी |
| ११९. | बाबा नाईक महाविद्यालय, कोकरुड, ता.शिराळा, जि.सांगली. | कला शाखा - बी.ए.भाग - १<br>दुसरी अतिरिक्त तुकडी |
| १२०. | आर्टस् अँण्ड कॉमर्स कॉलेज, कासेगाव, ता.वाळवा, जि.सांगली. | कला शाखा -बी.ए.भाग-१<br>दुसरी अतिरिक्त तुकडी |
| १२१. | गणपतराव आरवाडे कॉलेज ऑफ कॉमर्स, जि.सांगली | वाणिज्य शाखा बी.कॉम.भाग-१<br>चौथी अतिरिक्त तुकडी |
| १२२. | राजेंद्र महाविद्यालय, खंडाळा, ता.खंडाळा, जि.सातारा. | कला/वाणिज्य -बी.ए.भाग-१<br>दुसरी अतिरिक्त तुकडी |
| १२३. | प्रा.संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर, ता.कोरेगाव, जि.सातारा. | कला शाखा बी.ए.भाग-२- (१तुकडी) |
| १२४ | श्रीमंत भैय्यासाहेब राजेमाने महाविद्यालय, म्हसवड, ता.माण, जि.सातारा. | बी.ए.भाग - ३<br>दुसरी अतिरिक्त तुकडी |
| १२५. | राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय, औध, ता.खटाव, जि.सातारा. | कला शाखा -बी.ए.भाग-२<br>दुसरी अतिरिक्त तुकडी नैसर्गिक वाढ |

| | सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | |
|---|---|---|
| १२६. | हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर | बी.कॉम भाग १ -अतिरीक्त तुकडी १<br>एम.कॉम भाग १ |
| १२७. | विज्ञान महाविद्यालय, सांगोला | बी.एस्सी भाग १-अतिरीक्त दुसरी तुकडी १ |
| १२८. | कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर | बी.एस्सी भाग१-अतिरिक्त तीसरी तुकडी १ |
| १२९. | कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर | बी.कॉम भाग २-अतिरीक्त दुसरी तुकडी १ |

Scanned with OKEN Scanner

शासन आदेश क्रमांक एनजीसी २०१०/(२२६/१०)/मशि-४, दिनांक : १४ जुलै २०१०
(शैक्षणिक वर्ष २०१० -११ अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात अतिरिक्त तुकड्यांना मान्यता )

| अ.क्र. | संस्थेचे / महाविद्यालयाचे नाव | मान्यता दिलेल्या अतिरिक्त तुकड्या |
|---|---|---|
| १३०. | वालचंद कॉलेज ऑफ आर्टस अँन्ड सायन्स, सोलापूर | बी.एससी भाग १-अतिरिक्त तुकडी १ |
| १३१. | के.एन.भिसे आर्टस अँन्ड कॉमर्स कॉलेज, कुर्डुवाडी | बी.ए भाग २ अतिरीक्त तुकडी १ |

अटी व शर्ती:-

I. अस्तित्वात असलेल्या ज्या महाविद्यालयात अतिरिक्त तुकड्या मंजूर करण्यात आलेल्या आहेत, त्या महाविद्यालयाने त्यांच्या विभागीय सहसंचालकांकडे ते भविष्यात कोणत्याही परिस्थितीत अनुदानाची मागणी करणार नाहीत असे हमीपत्र रु. १००/- च्या नॉन ज्युडीशियल स्टँप पेपरवर सादर करावे.

II. संबंधित विभागीय सहसंचालकांचे हमीपत्र सादर केल्याविषयीचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय विद्यापीठाने संलग्नतेची प्रक्रिया सुरु करु नये.

III. विद्यापीठाने विहित केलेल्या निकषानुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार महाविद्यालयांनी, अध्यापक वर्ग/ कर्मचारी वर्ग नेमणे आवश्यक असून इतर सर्व आवश्यक पायाभूत सोयी उपलब्ध कराव्यात व त्याची खात्री विभागीय सहसंचालकानी ३० ऑगस्ट पर्यंत करावी व तद्नंतरच उपरोक्त अट क्रमांक २ मधील प्रमाणपत्र विद्यापीठास द्यावे.

IV. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या युजीसी ( ॲफिलिएशन ऑफ कॉलेजेस बाय युनीव्हर्सीटीज) रेग्युलेशन, २००९ मध्ये महाविद्यालयांना संलग्नीकरण देण्याबाबत विहीत केलेल्या निकषांची पूर्तता केल्याशिवाय संबंधित महाविद्यालयांना संलग्नीकरण देण्याची कार्यवाही विद्यपीठाने करु नये.

V. महाविद्यालयांने कोणत्याही परिस्थितीत मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश देऊ नयेत.

VI. नवीन विद्याशाखा मंजूर करण्यात आलेल्या महाविद्यालयांनी सन २०१०-११ व २०११-१२ मध्ये NAAC ॲक्रीडीएशन प्राप्त करुन घ्यावे व ते या कालावधीत न मिळविल्यास सदर अतिरिक्त तुकडीची मान्यता आपोआप रद्द होईल.

VII. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ८२ (५) व ८३(५) नुसार ही मान्यता शैक्षणिक वर्ष २०१०-११ साठी देण्यात येत आहे. ही मान्यता फक्त शैक्षणिक वर्ष २०१०-११ पूरतीच मर्यादित राहील. यावर्षी अतिरिक्त तुकडी सुरु न केल्यास ही मान्यता आपोआप रद्द होईल.

२. विद्यापीठाचे संलग्निकरण देण्याबाबत आवश्यक असलेली पुढील कार्यवाही विद्यापीठांनी करण्यापूर्वी शासनाच्या मान्यतेबाबतचे आदेश शासनाच्या संकेतस्थळावर अवलोकन केल्याशिवाय व विभागीय सहसंचालकाचे प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय संलग्नता देण्याची प्रक्रिया सुरु करु नये. विद्यापीठांनी संलग्नतेबाबतचा पूर्तता अहवाल संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांना पाठवावा.

Scanned with OKEN Scanner

३.	संबंधीत विद्यापीठांनी व विभागीय सहसंचालकांनी अतिरिक्त तुकड्यांबाबतचा नियतकालिक आढावा घेवून सदर अतिरिक्त तुकडीसाठी मंजूर विद्यार्थी संख्येच्या ५० टक्के किंवा त्यापेक्षा कमी विद्यार्थी दिसून आल्यास सदर अतिरिक्त तुकडी रद्द समजून तसे शासन व विद्यापीठाच्या माहितीने विभागीय सहसंचालकांनी आदेश काढावेत.

४.	हे आदेश, राज्य शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१००७१४१७२५५३००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सदाशिव शिवदास)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
१)	कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य,
२)	संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
३)	सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,
४)	संबंधित संस्था,
५)	निवड नस्ती (मशि-४)

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन

क्रमांक :युकेएफ-१०९३/५९७९-विशि-२,
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २८ मे, १९९३.

प्रति,

कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

विषय : सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षापासून कला, वाणिज्य व विज्ञान विद्याशाखा उघडण्यास परवानगी देण्याबाबत.....

संदर्भ : शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे पत्र क्रमांक: संलग्नता/टी-२/फा. ११०/११०३८, दिनांक १२ मार्च, १९९३.

महोदय,

सन १९९३-९४ या वर्षापासून राज्यातील अकृषी विद्यापीठांशी संलग्नीत महाविद्यालयांना कला, विज्ञान व वाणिज्य विद्याशाखा उघडण्याकरिता शासनाकडे प्राप्त झालेल्या शिफारशींचा विचार करुन १९९३-९४ पासून खाली नमूद केल्याप्रमाणे नवीन कला, वाणिज्य व विज्ञान विद्याशाखा उघडण्याकरिता आलेल्या अर्जांवर शिवाजी विद्यापीठ अधिनियम, १९७४ च्या कलम ४३[४] व [५] अन्वये पुढील कार्यवाही करण्याची विद्यापीठास परवानगी देण्याचे शासनाने ठरविले आहे.

| महाविद्यालयाचे नांव | विद्याशाखा |
| --- | --- |
| विज्ञान महाविद्यालय, सांगोला | कला |

शासनाने संलग्नीकरणाकरिता वर दिलेली परवानगी ही पुढील अटींवर आहे :-

[१] सदर विद्याशाखा सुरु करण्यास सध्या विना अनुदान तत्वावर परवानगी देण्यात आली आहे. शासन निर्णय क्रमांक एनजीसी २०९१/[३५६७] विशि-२ अ, दिनांक ८ ऑगस्ट, १९९१ अन्वये लागू करण्यात आलेल्या सूत्रानुसार या विद्याशाखा अनुदान संहिता तत्वावर आणण्याचा विचार यथावकाश करण्यात येईल.

[२] ज्या विद्याशाखा उघडण्याची परवानगी देण्यात आलेली आहे त्या प्रत्येक विद्याशाखेच्या त्रिवर्षीय पदवी परीक्षेच्या पहिल्या वर्षाच्या वर्गात

कृ.मा.प..

विज्ञान महाविद्यालय, सांगोले
जावक नंबर — 96

Scanned with OKEN Scanner

खाली दर्शविल्याप्रमाणे विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला तरच वर्ग १९९३-९४ पासून सुरु करावा.

| | |
|---|---|
| १] शहरी विभाग | ६० |
| २] आदिवासी विभाग | ४० |
| ३] ग्रामीण विभाग | ५० |
| ४] महिला महाविद्यालये | ५० |

तसेच १९९३-९४ या शैक्षणिक वर्षांच्या शेवटी होणा-या प्रथम वर्षाच्या विद्यापीठ परीक्षेत कमीत कमी खालीलप्रमाणे विद्यार्थी बसले पाहिजेत.

| | |
|---|---|
| १] शहरी विभाग | ५० |
| २] आदिवासी विभाग | ३० |
| ३] ग्रामीण विभाग | ४० |
| ४] महिला महाविद्यालय | ४० |

३. स्थानिक चौकशी समिती, कार्यकारी परिषद व सिनेट यांचा अहवाल वि विद्यापीठाकडून प्राप्त झाल्यावर कलम ४३[६] व [७] यानुसार अंतिम संलग्नीकरणाचे आदेश शासनाकडून निर्गमित करण्याबाबत योग्य ती कार्यवाही केली जाईल.

४. संबंधित संस्थेस विद्याशाखा सुरु करण्याची परवानगी देताना त्या संस्थेस विद्यापीठाने असे नि:संदिग्धपणे कळवावे की, प्रवेश सध्या तात्पुरत्या स्वरूपात देऊन जर ६० विद्यार्थी प्रवेश घेतील तरच प्रत्यक्षात वर्ग सुरु करावेत. महाविद्यालयात पुढे देण्यात येणारे संलग्नीकरण ही अट पूर्ण करण्यावरच अवलंबून राहील. अन्यथा महाविद्यालयांना संबंधित विद्याशाखा बंद करावी लागेल. कलम ४३[६] व [७]अनुसार संलग्नीकरणाचा अंतिम प्रस्ताव शासनाकडे पाठविताना ही अट पूर्ण झाली किंवा नाही याबद्दल प्रस्तावामध्ये उल्लेख करावा अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे.

पत्राची प्रत संबंधित व्यवस्थापनाकडे पाठविण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

श्री. रा. जोशी

[ श्री. रा. जोशी ]

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

शिक्षण संचालक [उच्च शिक्षण], महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रशासन अधिकारी [उच्च शिक्षण अनुदान] कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

सचिव, सांगोले तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे विज्ञान महाविद्यालय, सांगोला, जिल्हा-सोलापूर.

प्रत, उच्च शिक्षणमंत्री यांचे स्वीय सहाय्यक

निवड नस्ती, विशि-२, विशि-२ अ.

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन

क्रमांक-विविसं-१०९४/अ.नु./७५६०/मशि-३
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- 22/12/94

प्रति,
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय :- सन १९९४-९५ पासून अतिरिक्त तुकड्यांना शासन मान्यता देण्याबाबत..

संदर्भ :- शासनाची समक्रमांकाची दि.१९-८-९४ व ३-१०-९४ ची पत्रे.

महोदय,

संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांचे पत्र क्र.एनजीसी-१०९४/तुकडा मंजूरी/९-अ, दिनांक- २०-१०-९४ अन्वये शिफारस केलेल्या पुढील महाविद्यालयांच्या अतिरिक्त तुकड्या सुरू करण्याच्या प्रस्तावास महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ८२[५] अन्वये वर्ष ९४-९५ पासून शासन मंजूरी देण्यात येत आहे.

विद्यापीठाने अधिनियमातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करून पूर्तता अहवाल संचालक, उच्च शिक्षण व संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना अनुदान निर्धारणासाठी कृपया पाठवावा.

| महाविद्यालयाचे नांव<br>१. | विद्याशाखा<br>२. | मंजूर तुकड्या<br>३. |
|---|---|---|
| १] छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड कॉमर्स, सोलापूर | बीएभाग-१ साठी | १ अतिरिक्त तुकडी |
| २] शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज जि. सोलापूर | बी.ए.भाग-३ साठी | १ अतिरिक्त तुकडी |
| ३] उमा महाविद्यालय, पंढरपूर जि. सोलापूर | बी.ए.भाग-१साठी | १ अतिरिक्त तुकडी |
| ४] विज्ञान महाविद्यालय सांगोला जि. सोलापूर | बी.ए.भाग-१ साठी | १ अतिरिक्त तुकडी |
| ५] आटपाडी कॉलेज, आटपाडी जि. सांगली | बी.ए.भाग-१ साठी | १ अतिरिक्त तुकडी |
| ६] राजे रामराव महाविद्यालय, जत जि. सांगली. | बी.ए.भाग-३ साठी] | १ अतिरिक्त तुकडी |

...२/-

Scanned with OKEN Scanner

उपरोक्त नमूद केलेल्या महाविद्यालयांना त्यापुढे दर्शविलेल्या अतिरिक्त तुकडीस वर्ष ९४-९५ पासून विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास शासनाची मंजुरी देण्यात येत आहे. इतर महाविद्यालयांच्या अतिरिक्त तुकड्यांच्या प्रस्ताव नामंजूर करण्यात आला असून शिक्षण संचालक, [ उच्च शिक्षण] यांनी संबंधित महाविद्यालयास तसे कळवावे.

आपला विश्वासू,

[ वि. ला. भोई ]
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१] शिक्षण संचालक [ उच्च शिक्षण ] महाराष्ट्र राज्य, पुणे.
२] शिक्षण सहसंचालक [ उच्च शिक्षण ] कोल्हापूर विभाग कोल्हापूर
३] -"- पुणे विभाग पुणे
४] प्राचार्य- [ ६ महाविद्यालये ]
५] निवड नस्ती, कार्यासन मशि-३

पोकळे- २११२

विज्ञान महाविद्यालय, सांगोले
आवक नंबर —— 288
दिनांक 5/9/1994

महाराष्ट्र शासन
क्रमांक: एनजीसी १०९५/तुकड्या/[२२३/९५]मशि-३
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०००३२
दिनांक:- १२ ऑक्टोबर, १९९५

प्रति,
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

विषय:- विद्यापीठाच्या अधिपत्याखालील महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष १९९५-९६ पासून अतिरिक्त तुकड्यांना विद्यापीठ कायदा १९९४ च्या कलम ८२[५]अन्वये मंजूरी देण्याबाबत.

संदर्भ:- संचालक, उच्च शिक्षण यांचे पत्र क्र. एनजीसी१९९५/ विभाग/कोल्हापूर/मवि-२
दि. ३१.७.९५

महोदय,

संदर्भाधीन पत्रान्वये संचालक, उच्च शिक्षण यांनी शिफारस केलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या कक्षेतील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांत वर्ष-१९९५-९६ पासून नवीन अतिरिक्त तुकड्या सुरु करण्यात महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियमाचे कलम ८२[५] अन्वये, प्रत्येक तुकडीत किमान ८० विद्यार्थी प्रवेश क्षमता राखण्याच्या अटीवर व विना अनुदान तत्वावर शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

अतिरिक्त तुकड्यांना मंजूरी देण्यात आलेल्या सदर महाविद्यालयांची यादी[परिशिष्ट"अ"] सोबत जोडली आहे.

विद्यापीठाने संलग्नीकरणाविषयक आवश्यक असलेली कार्यवाही करुन पूर्तता अहवाल संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच संबंधित सहसंचालक उच्च शिक्षण यांना कृपया पाठवावा.

आपला विश्वासू,
स.द.पडवळ
[ स. द. पडवळ ]
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
१] शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
(परिशिष्टातील टिप कार्यवाहीसाठी लक्षात घ्यावी)
२] सहसंचालक, उच्च शिक्षण,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर
३] प्राचार्य, संबंधीत सर्व महाविद्यालये
४] निवड नस्ती मशि-३

Received on
26/10/95

## परिशिष्ट "अ"

शासन पत्र क्रमांक: शिविसं १०९५/तुकड्या/[२२३/९५] मशि-३ दि.१२ ऑक्टोबर १९९५ अन्वये अतिरिक्त तुकड्या मंजूर केलेल्या महाविद्यालयांची यादी.

| महाविद्यालयाचे नांव | विद्याशाखा | मंजूर केलेल्या तुकड्या |
|---|---|---|
| १. | २. | ३. |
| **जिल्हा: कोल्हापूर** | | |
| १] विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर. | १] बी.ए. भाग-१साठी | एक अतिरिक्त तुकडी |
| | २] बी.ए. भाग-२साठी | ---"--- |
| | ३] बी.एस्सी. भाग-३ साठी | ---"--- |
| २] गोपाळकृष्ण गोखले कॉलेज, कोल्हापूर | १] बी.ए. भाग-३ साठी | ---"--- |
| ३] कला शास्त्र व विज्ञान महाविद्यालय, इचलकरंजी | १] बी.ए. भाग-३ साठी | ---"--- |
| ४] यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर | १] बी.ए. भाग-१ साठी | ---"--- |
| | २] बी.ए. भाग-२ साठी | |
| ५] न्यु कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स, मुरगुड | १] बी.ए. भाग-१ साठी | ---"--- |
| | २] बी.ए. भाग-२ साठी | ---"--- |
| ६] स.ब. खाडे महाविद्यालय, कोपार्डे | १] बी.ए. भाग-१ साठी | ---"--- |
| | २] बी.ए. भाग-२ साठी | ---"--- |
| ७] कन्या महाविद्यालय, इचलकरंजी | १] बी.ए. भाग-१ साठी | ---"--- |
| | २] बी.ए. भाग-२ साठी | ---"--- |
| ८] यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी | १] बी.ए. भाग-१ साठी | ---"--- |
| | २] बी.ए. भाग-२ साठी | ---"--- |
| ९] देवचंद कॉलेज, अर्जुननगर | १] बी.ए. भाग-३ साठी | ---"--- |
| १०] जयसिंगपूर महाविद्यालय, जयसिंगपूर | १] बी.ए. भाग-१ साठी | ---"--- |

...२

Scanned with OKEN Scanner

| १. | २. | ३. |
|---|---|---|
| **जिल्हा: सांगली** | | |
| १] विश्वासराव नाईक महाविद्यालय, शिराळा | १] बी.ए.भाग-२ साठी. | एक अतिरिक्त तुकडी. |
| २] शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज. | १] बी.ए.भाग-१ साठी | ---"--- |
| | २] बी.ए.भाग-३ साठी | ---"--- |
| ३] सौ. मालती वसंतदादा पाटील महाविद्यालय, [कन्या], इस्लामपूर. | १] बी.ए.भाग-१ साठी | ---"--- |
| | २] बी.ए.भाग-२ साठी | ---"--- |
| ४] पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील महाविद्यालय, तासगाव | १] बी.ए.भाग-२ साठी | ---"--- |
| | २] बी.ए.भाग-३ साठी | ---"--- |
| ५] आटपाडी कॉलेज, आटपाडी. | १] बी.ए.भाग-१ साठी | ---"--- |
| | २] बी.ए.भाग-२ साठी | ---"--- |

१४

| | | |
|---|---|---|
| **जिल्हा सातारा** | | |
| १] महिला महाविद्यालय, कराड | १] बी.ए.भाग-१ साठी | एक अतिरिक्त तुकडी |
| | २] बी.ए.भाग-२ साठी | ---"--- |
| २] वेणूताई चव्हाण महाविद्यालय, कराड | १] बी.ए.भाग-१ साठी | ---"--- |
| ३] कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, लोणंद | १] बी.ए.भाग-१साठी | --"-- |
| | २] बी.ए.भाग-२ साठी | -- "-- |
| | ३] बी.ए.भाग-३ साठी | ---"-- |
| ४] शहाजीराजे महाविद्यालय, खटाव | १] बी.ए.भाग-१ साठी | --"--- |
| | २] बी.ए.भाग-२ साठी | --"--- |
| | ३] बी.ए.भाग-३ साठी | --"--- |
| ५] किसन वीर महाविद्यालय, वाई. | १] बी.एस्सी. भाग-१ साठी | -- -- |
| ६. दहीवडी कॉलेज, दहीवडी | १] बी.ए.भाग-१ साठी | --"-- |
| | २] बी.ए.भाग-३ साठी | --"--- |
| ७. काकासाहेब चव्हाण महाविद्यालय, तळमावले | १] बी.ए.भाग-१ साठी | --"-- |
| | २] बी.ए.भाग-२ साठी | ---"-- |

..3

| १. | | २. | ३. |
|---|---|---|---|
| ८. | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पाचवड | १] बी.ए. भाग-१ साठी | एक अतिरिक्त तुकडी. |
| | **जिल्हा: सोलापूर** | | |
| १. | विज्ञान महाविद्यालय, सांगोला | १] बी.ए. भाग-१साठी<br>२] बी.ए. भाग-२ साठी | ---"---<br>---"--- |
| २. | कला व वाणिज्य महाविद्यालय, कुर्डूवाडी | १] बी.ए. भाग-१ साठी<br>२] बी.ए. भाग-२ साठी | ---"---<br>---"--- |
| ३. | कला व वाणिज्य महाविद्यालय, वैराग | १] बी.ए. भाग-१ साठी<br>२] | --"--- |
| ४. | उमा महाविद्यालय, पंढरपूर | १] बी.ए. भाग-२ साठी | ---"-- |
| ५. | श्री. भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी | १] बी. ए. भाग-१ साठी | --"-- |
| ६. | कै. ए.आर. बुर्ला वरिष्ठ महिला महाविद्यालय, सोलापूर | १] बी. ए. भाग-१साठी | --"-- |
| ७. | श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी | १] बी. ए. भाग-३साठी | --"-- |
| ८. | देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय, मोहोळ | १] बी. ए. भाग-१साठी | --"-- |
| ९. | सी. बी. खेडगी वसवेश्वर, राजा विजयसिंह कॉमर्स, राजा जयसिंह आर्टस कॉलेज, अक्कलकोट. | १] बी. ए. भाग-२ साठी | एक अतिरिक्त तुकडी |
| १०. | छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स, सोलापूर. | १] बी. ए. भाग-१ साठी<br>२] बी. ए. भाग-२ साठी | --"--<br>--"-- |

टिप :- वर नमूद केलेल्या महाविद्यालयांना त्यासमोर दर्शविलेल्या तुकड्यांना शासनाची मंजूरी देण्यात आली असून यादीत समावेश नसलेल्या महाविद्यालयांना, संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांचा प्रस्ताव नामंजूर केल्याचे परस्पर कळवावे.

----

महाराष्ट्र शासन

क्रमांक:-शिविसं-१००१/अति.तुकडी(७१८/०१)/मशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२
दिनांक १० एप्रिल, २००१

प्रति,
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

**विषय : विज्ञान महाविद्यालय, सांगोले, जि. सोलापूर**
**बी.ए.भाग-१ च्या अतिरिक्त तुकडीस मंजूरी मिळणेबाबत**

**संदर्भ:- विद्यापीठाचे पत्र क्रमांक- संलग्नता/ टी-४/७९२५,**
**दि.७ सप्टेंबर, १९९९**

महोदय,

संदर्भाधीन पत्रान्वये, विद्यापीठाने विज्ञान महाविद्यालय, सांगोले, जि. सोलापूर या महाविद्यालयात सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासून प्रथम वर्ष कला शाखेची ४थी अतिरिक्त तुकडी सुरु करण्यास केलेली शिफारस तसेच, संस्थेचे चिटणीस यांनी दि. २८.०२.२००१ रोजी शासनास सादर केलेले शपथपत्र विचारात घेऊन, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ चे कलम ८३ (५) अन्वये प्रथम वर्ष कला शाखेची ४ थी अतिरिक्त तुकडी " कायम विना अनुदान " तत्वावर सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

२. उपरोक्त तुकडीस संलग्नीकरण देण्याबाबत आवश्यक असलेली कार्यवाही कृपया विद्यापीठाने करावी व पूर्तता अहवाल संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना पाठवावा.

आपला विश्वासू,
(श. वि. दुबे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग कोल्हापूर,
प्राचार्य, विज्ञान महाविद्यालय, सांगोले, जि. सोलापूर ४१३३०७,
निवड नस्ती मशि-३

Scanned with OKEN Scanner